# 22 विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून विषबाधा

## 6 विद्यार्थ्यांवर उपचार सुरु



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.29 )** - तालुक्यातील अडगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील जवळपास 20 ते 22 विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून विषबाधा झाल्याची घटना आज दि.29 डिसेंबर रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली. या घटनेमूळे पालक वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार अडगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असून या ठिकाणी गावातील 80 विद्यार्थी वर्ग 1 ते 4 पर्यंत शिक्षण घेत आहे. यामध्ये 6 ते 10 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शनिवारी दि.28 डिसेंबर रोजी सकाळी 9 ते 1 या सत्रातील गावातील विद्यार्थी नेहमीप्रमाणे शाळेत गेले. दररोज देण्यात येणाऱ्या पोषण आहारात विद्यार्थ्यांना खिचडी व मोट देण्यात आली. दुपारी 1 वाजता शाळेला सुट्टी झाल्यावर सर्व विद्यार्थी आपापल्या घरी परतले. रात्री 11 ते 12 वाजताचे दरम्यान 22 विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, संडास सुरू झाली. पालक वर्गात कमालीची धावपळ सुरू झाली.या घटनेची माहिती राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डहाणे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी आसोले यांना दिली. त्यांनी लगेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ.महेश जयस्वाल व विचोरी टीम घटनास्थळी रवाना झाली. डॉ.गणोरकर व डॉ.बागडे यांनी सुद्धा विषबाधा रुग्णांवर औषधोपचार सुरू केला. तालुका आरोग्य अधिकारी यांच्या टीमने सुद्धा गावात जाऊन इंजेक्शन, ओआरएस पावडर, टॅबलेट गोळ्या रुग्णांना दिल्या असून सध्यस्थितीत विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांची प्रकृती नियंत्रणात आहे. शासनाकडून येणारा पोषण आहार ठेवण्याची रूम सुस्थितीत आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. त्या ठिकाणी पाल किंवा उंदीर असल्यास पोषण आहारातून विषबाधा होऊ शकते. मोर्शीचे गटविकास अधिकारी उज्वला ढोले, शाळेचे मुख्याध्यापक भागवत हे घटनास्थळी ठाण मांडून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

### सॅपल्स तपासणीला पाठविले

19 विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून विषबाधा झाल्याची माहिती मिळाली होती. आम्ही तातडीने आमची टीम घटनास्थळी पाठविली. 6 विद्यार्थ्यांना जास्त लागण झाल्याने त्यांना आडगाव येथील आमच्या आयुर्वेदीक दवाखान्यामध्ये सर्व व्यवस्था करुन त्यांना दाखल करण्यात आले. विषबाधा झालेल्या अन्नाचे सॅपल्स तपासणीकरिता पाठविण्यात आले आहे.

**डॉ.आसोले,**
**जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती.**

# वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरची बैलगाडीला धडक

## तिघे जखमी, एक गंभीर, सांगवा फाट्यावरील घटना






**महासागर प्रतिनिधी**

**खल्लार,( दि.29 )-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील सांगवा फाट्यावर अवैध वाळू तस्करी करणाऱ्या भरधाव ट्रॅक्टरने शेतात जाणाऱ्या बैलगाडीना जोरदार धडक दिली. या धडकेत बैलगाडीत बसलेले तिघे गंभीर जखमी झाले, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. तर दोन जण किरकोळ जखमी झाले असून गंभीर असलेल्यास अमरावती येथे खाजगी दवाखान्यात हलविण्यात आले आहे. ही घटना आज (दि. 28 डिसेंबर) सकाळी 5.30 वाजताच्या सुमारास घडली. या जखमीला अमरावती येथे हलविण्यात आले आहे.

दिलीप निरंजन सावळे (42), संतोष सुखदेव झोड (45), पुरुषोत्तम हरिभाऊ मदनकर (60) हे तिघेजण शेतातील कामासाठी बैलबंडीत बसून जात असतांना अवैध वाळू घेऊन जात असलेल्या निळ्या रंगाचे ट्रॅक्टरने जोरदार धडक दिली. या धडकेत तिघेही जखमी झाले असून दिलीप निरंजन सावळे गंभीर जखमी झाले असून दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत. चंद्रभागा नदीपात्रातून दररोज रात्रीच्या सुमारास अवैध वाळूची तस्करी मोठया प्रमाणात होत आहे.


मात्र याला आळा घालण्यास प्रशासन अपयशी ठरत आहे. दरम्यान घटनेची माहिती गावात पसरताच घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली होती. जोपर्यंत ट्रॅक्टर चालकास अटक होत नाही, तोपर्यंत ट्रॅक्टर पोलिसांच्या ताब्यात देणार नाही, अशी भूमिका नागरिकांनी घेतल्याने तणाव निर्माण झाला होता. ट्रॅक्टर व ट्रॉली खल्लार पोलिसांनी ताब्यात घेतली असून ट्रॅक्टर चालकाचा शोध घेणे सुरु आहे. याप्रकरणी अज्ञात चालकाविरुध्द खल्लार ठाण्यात कलम 281,325,125(अ ), 125(ब) व्ही एनएस मोटर वाहन कायदा 50/177 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार ट्रॅक्टर चालकाचा शोध घेणे सुरु असल्याची माहिती खल्लार पोलिसांनी दिली.

# कापूस वेचताना महिलेला सर्पदंश

**धामणगाव रेल्वे** - धामणगाव रेल्वे तालुक्यातील जळकापट शेतशिवारात कापूस वेचण्यासाठी गेलेल्या महिलेला सर्पदंश झाला. इतर मजुरांनी महिलेला तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. जिथे महिलेवर उपचार सुरू आहेत. आठवडाभरात सर्पदंशाची तालुक्यात ही तिसरी घटना आहे. अनिता नरेंद्र कुंभारे (40, रा.धानोरा, मोर्शी) असे सर्पदंश झालेल्या महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिता कुंभारे ही महिला जळकापट येथील प्रमोद तायडे यांच्या शेतात शेतीच्या कामासाठी राहते. दरम्यान अशातच कापूस वेचत असताना महिलेच्या पायाला साप चावला. ही बाब इतर मजुरांच्या लक्षात येताच त्यांना तातडीने येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. जेथे त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. दरम्यान, गुरुवारी 26 डिसेंबर रोजी दाभाडा येथील प्रणव ठाकरे यांना शेतातून परतत असताना साप चावला होता. यासह शहरातील तुळजाई नगर येथील केशव नागपुरे (15) याला खेळताना साप चावला, त्याच्यावर यवतमाळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.आठवड्याभरात अशा तीन घटना तालुक्यात झाल्या आहेत.

# ढगाळ वातावरणाचा पिकांना धोका

## कपाशीवर लाल्या, तूर, हरभऱ्यावर मररोग



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )** - दोन दिवसापूर्वी बरसलेला अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरणाचा परिणाम पिकांवर होत आहे. उत्पन्नात घट होणार असल्याची चिन्हे दिसत आहे. कपाशीवर लाल्या, तूर, हरभऱ्यावर मररोग तर गहू पिकावर तांब्या रोगाने आक्रमण केल्यामुळे शेतकरी चिंतेत सापडलेला आहे.

यावर्षी खरीप हंगामातील कपाशी पिकावर लाल्या नावाच्या रोगाने कपाशी पिक धोक्यात आले. तूरीचे पिक चांगले बहरले होते. परंतु गेल्या पंधरा दिवसा आधी फार मोठी धुवारी पडल्यामुळे उभ्या तूरीची झाडे सोकू लागली. त्यामुळे तूरीची नापिकी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकरी नापिकीमुळे चिंतेत दिसून येत आहे. सध्या सुरू असलेली रब्बी हंगामातील प्रमुख पिक हरभरा आहे. तिवसा तालुक्यातील कुऱ्हा व वऱ्हा, मारडा, अंजनवती, भिवापूर, बोर्डा, हसनापूर, दुर्गवाडा, धारवाडा, कौंडण्यपूर, जहागीरपूर, वंडली, छिंदवाडी या परिसरात भरपूर हरबऱ्याचा पेरा आहे. मात्र त्याही पिकावर मर नावाचा रोग आल्याचे दिसून येते आहे तर गहू पिकावर तांबेरा नावाचा रोगाचे सावट आहे. ढगाळ वातावरणामुळे यावर्षी पिकांची परिस्थिती फारच वाईट आहे. शेतकऱ्यांवर पुन्हा संकट आले आहे. महागडे बी बियाणे, खते, कीटकनाशके तसेच मजुरी खर्च करूनसुद्धा पिकातून उत्पन्न हाती येत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करून त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी या परिसरातील शेतकरी करीत आहे.

# महिलेवर बळजबरीने अत्याचार

## मंगरूळ चव्हाळा हद्दीतील घटना

**अमरावती-** मंगरूळ चव्हाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका 25 वर्षीय तरुणाने महिलेच्या घरात घुसून तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याची घटना 28 डिसेंबर रोजी दुपारी 3 वाजता घडली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी संशयीत आरोपी सुमित निखाडे (25) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगरूळ चव्हाळा पोलिस स्टेशन हद्दीत राहणारी तक्रारदार महिला 28 डिसेंबर रोजी घरात काम करत होती. यावेळी अचानक आरोपी सुमित निखाडे घरात घुसला. महिलेला एकटी पाहून सुमितने दरवाजा आतून लावला. त्याने महिलेला पकडून दिवाणावर ढकलले आणि बळजबरीने अत्याचार केला. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेला. घटनेनंतर महिलेने मंगरूळ चव्हाळा पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी सुमित निखाडेविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.,

# जामगाव खडका येथील रवींद्र पंधरे ठरला गावातील दुसरा सैनिक



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.29 )** - तालुक्यांतर्गत येत असलेल्या जामगाव खडका येथील रवींद्र पंधरे तरुणाची निवड सीआरपीएफमध्ये झाल्यामुळे गावातील नागरिकांनी त्या तरुणाचे अभिनंदन करून त्याचा सत्कार केला. शनिवार (दि.28) ला गावातील हनुमान नगर परिसरात करण्यात आला आहे. हा तरुण गावातील सीआरपीएफ मध्ये निवड झालेला दुसरा सैनिक असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे. रवींद्र पंधरे याने अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. तो देशाची सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून सतत परिश्रम घेत होता. सीआरपीएफमध्ये निवड झाल्याने गावकऱ्यांना त्याचा अभिमान वाटत आहे. आज पर्यंतच्या इतिहासात गावातील सीआरपीएफ च्या निवडीमध्ये हा दुसरा व्यक्ती असल्याचे समजते. यापूर्वी गावातील अत्यंत गरीब कुटुंबातील रमेश शेषकार या व्यक्तीने सीआरपीएफ होते, जे आता सेवानिवृत्त झाले असून नागपूर येथे स्थायिक झालेले आहेत हे विशेष. त्याच्या अखिल माकोडे मित्रपरिवारातर्फे रवींद्रचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रीतम गावंडे, राजू जोशी, प्रशांत भुजाडे, देवेंद्र ठाकरे, गोपाल जोशी, मोहित कोठे, सौरव काकपुरे, उमेश राऊत, संचित केचे, रोहित लांजेवर, छोटू घोंगडे, आदेश घोंगडे, योगेश गिद, रोशन वानखडे, राहुल शिवारे, व समस्त गावकरी उपस्थित होते.

# बडनेरा पोलिसांनी पकडला दुचाकी चोर

## पाच दुचाकी जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 29 )** - बडनेरा पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाने (डीबी) दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात एका आरोपीला अटक केली. त्याच्या ताब्यातून पाच दुचाकी जप्त केल्या आहेत.

5 डिसेंबर रोजी फिर्यादी तेजस बिपीनचंद्र शहा (वय 53 वर्ष रा. जयस्तंभ चौक नवीवस्ती, बडनेरा) यांनी बडनेरा ठाण्यात तक्रार दिली की, त्यांची होंडा अॅक्टीवा दुचाकी क्रमांक एमएच 27 बीडी 4756 (की.अं.30,000/रू) ही त्यांचे जयस्तंभ चौकातील शहा मेडीकल समोरून अज्ञात चोराने चोरून नेले. या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला. सदर गुन्हयाचे तपासामध्ये गुप्त माहीतीवरून पोलिसांनी असलम खान अहेमद खान (वय 26 वर्ष रा. रहेमतनगर गल्ली नं.2, नागपुरी गेट, अमरावती) व शाहीद खान फिरोज खान (वय 25 वर्ष रा. रहेमतनगर, सरकारी दवाखान्यासमोर, अमरावती) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची विचारपुस केली असता त्यांनी सदर दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून दुचाकी जप्त केली. तसेच पोलिसांनी आरोपींची कसून चौकशी केली असता, त्यांनी आणखी चार दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून एमएच 27 सीपी 9239 ग्रे रंगाची जुपीटर, एमएच 27 डीएम 8313 केशरी रंगाची जुपीटर, एमएच 27 एसी 3957 काळया रंगची बजाज पल्सर, व एमएच 31 एफजे 3148 ग्रे रंगाची होंडा युनीकॉन असा एकुण 2 लाख 10 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेडडी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांचे मार्गदर्शनाखाली बडनेराचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण, काईमचे पोलिस निरीक्षक प्रफुल गिते, डि.बी. पथकाचे एएसआय प्रमोद गुडधे, पोलिस हवालदार मंगेश परीमल, रोशन, इरफान रायलीवाले, प्रविण बेंगेकर, शशीकांत शेळके, शैलेश ठाकुर, महीद्रा, अतुल राउत, शुभम कडुकार, शाम यांनी केली आहे.

# नायलॉन मांजा उठला नागरिकांच्या जीवावर

## अंजनगाव सुर्जीत घटनांची मालिका



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.29 )-** पतंग उत्सवाच्या काळात पतंग उडविण्यासाठी नॉयलन मांजा वापर व विक्रीवर सर्वत्र बंदी असताना शहरात मात्र अनेक पतंग विक्रेते या मांज्याची विक्री करित आहे. या माज्यांच्या वापरामूळे गळा कापणे, हात, पायाची बोटं कापणे, शरीराच्या इतर भागास इजा पोहचणे इत्यादी प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहे. पोलिसांनी यावर तातडीने कारवाई अशी मागणी होत आहे.

सद्या दोन महिन्यांचा पतंग उडविण्याचा उत्सव जोरात सुरू आहे. या उत्सवात नॉयलन मांजाचा सर्रास वापर नागरिकांच्या जीवावर बेतणारा ठरत आहे. शहरातील अनेक दवाखान्यात याबाबत रुग्ण येत आहेत.

शुक्रवारी (ता.27) येथील गुलजारपुरा भागातील डॉ.युवराज पाटील यांच्या दवाखान्यात एक युवक आला, या युवकाची हाताची करंगळी मांज्यामूळे हाडासह कापल्या गेली होती. डॉक्टरांना या युवकाच्या हातावर सर्जरी करावी लागली. गेल्या आठ दिवसात त्यांच्याकडे तीन ते चार नागरिक मांज्यामूळे जखमी झाले. याशिवाय शहरातील अनेक रुग्णालयामध्ये नॉयलन मांजाने जखमी झालेले नागरिक उपचार घेत आहे. पतंग उत्सवात सध्या नायलॉन धाग्यांचा वापर होत आहे. नायलॉन मांज्या विक्री व वापरावर विरोधात कडक निर्देश असूनही सर्रास नायलॉन मांज्याची विक्री केली जात आहे. अनेक व्यावसायिक चोरट्या पध्दतीने हा मांजा विकत आहे.

### पक्षांच्या जीवालाही धोका

या मांजा मुळे नागरिकांनाच नाही तर आकाशात उडणाऱ्या पक्षांनाही मोठी झळ पोहोचत आहे. अनेक पक्षी या नॉयलान मांजामुळे पंख चिरल्याने मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे या मांज्याचा वापर व विक्रीवर कडक व्हावी अशी मागणी पक्षीप्रेमींची आहे.

### तातडीने कारवाई केली जाईल

"नॉयलन मांजा वापर व विक्रीवर बंदी असून लोकांनी पतंग उत्सवात त्याचा वापर न करता साध्या धाग्यांचा वापर करावा, जर कोणी विक्रेता पतंग विक्रीच्या आड हा मांजा विक्री करतांना आढळल्यास त्यांच्यावर कडक करावी केल्या जाईल. शिवाय पालकांनी सुद्धा आपला अल्पवयीन मुलगा पतंग उडवताना या मांजाचा वापर करत असेल तर त्याला आडकाठी करावी मांजा विक्री व वापर यावर तातडीने कारवाई केल्या जाईल.

**प्रकाश अहिरे,**
**पोलीस निरीक्षक,अंजनगाव सुर्जी.**

### विक्रेत्यावर कडक कारवाई करावी

"नॉयलान मांज्यामुळे गंभीर दुखापत होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत आहे. पतंग उत्सवात हा मांजा सहज विकत मिळत असल्याने त्याचा सर्रास वापर सुरू आहे. बंदी असताना विक्री व वापर सुरू राहणे यामुळे एखादी जीवघेणी घटना घडू शकते. त्यामुळे या मांजाच्या विक्रीवरच कडक कारवाई व्हावी, जेणेकरून तो वापर करणाऱ्यांना मिळणारच नाही, तेव्हा कुठेतरी याचा वापर बंद होईल.

**डॉ.युवराज पाटील, शहर सरचिटणीस**
**वैद्यकीय आघाडी, भाजपा**

# अमनच्या मृत्यूने समाजमन हळहळले

## 10 महीण्यापासूनची सोयरासीस आजाराशी झुंज संपली



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.29 )-** गेल्या 10 महीण्यापासून 7 व्या वर्गातील विद्यार्थी अमनची सोयरासीस या भयंकर वेदना देणा-या आजाराशी सुरू असलेली झुंज अखेर संपली व त्याला मृत्युने कवटाळले. समाजमन हळहळून टाकणारी ही घटना अचलपूर तालुक्यातील शिंदी बु. या गावातील आहे.

अमन प्रेमचंद बैटवार असे मृत्यूमुखी पडलेल्या मुलाचे नाव असून बैटवार कुटुंब हे यवतमाळ जिल्ह्यातील,कळंब तालुक्यातील, वटबरी या गावाचे आहे. गेल्या पाच वर्षांपासून ते शिंदी बु. येथे वास्तव्यास आहेत. अमन हा जनता हायस्कूल चा इयता 7 वी चा विद्यार्थी होता. गेल्या दहा महिन्यांपासून तो सोयरासीस या आजाराने ग्रस्त होता. हा आजार भयंकर वेदना देणारा असून त्यामुळे तळपायासह पुर्ण शरीरावर जखमा होतात. परतवाडा, अमरावती सह अनेक ठिकाणी त्याच्यावर तज्ज्ञांकडून उपचार करण्यात आले. अमन ने मोठ्या हिमतीने या आजाराचा सामना केला.

परंतु शनिवारी(दि.28) ला त्याची प्राणज्योत मालवली. त्याच्या मृत्यूची वार्ता समजताच शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व गावातील नागरिकांची त्याला पाहण्यासाठी गर्दी उसळली होती. अमन बुद्धीमान विद्यार्थी असल्याचे शिक्षकानी सांगितले. खेळकर प्रवृत्ती असलेल्या अमनच्या जाण्याने अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मेळघाटमध्ये झोलाछाप डॉक्टरांचा सुळसुळाट!

## मध्यप्रदेशातील बोगस दवाखाने थाटले मेळघाटात

मारोती पाटणकर

**चुरणी** ( दि.29 )-मेळघाटात आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेत मध्यप्रदेशातील झोलाछाप बोगस डॉक्टरांनी आपली ठिकठिकाणी दुकानदारी थाटली आहे. त्यांच्या अघोरी उपचारांमुळे येथील नागरिकांच्या आरोग्याला व जीविताला धोका निर्माण झाला आहे.

मेळघाटातील सुगम आणि दुर्गम भागात एमबीबीएस डॉक्टर फिरकत नाही, जी बाब चिंताजनक आहे. त्यामुळे मेळघाटातील गावागावात मध्यप्रदेशाचे बोगस झोलाछाप डॉक्टरांचे प्रस्थ वाढले आहे. कमी दरात उपचार होत असल्याने रुग्णही त्यांच्याकडे जातात. ग्रामीण भागात या झोलाछाप डॉक्टरांचा व्यवसाय धडाक्यात सुरु आहे. याहूनही गंभीर बाब म्हणजे प्रशासन त्यांच्यावर कारवाई करित नाही. मेळघाटातील ग्रामीणच्या नाड्या मध्यप्रदेशाचे बोगस डॉक्टरांकडून तपासल्या जात आहेत. गाव खेड्यांमध्ये बोगस डॉक्टरांचे दवाखाने धडाक्यात सुरु आहेत. या बोगस डॉक्टरांच्या अघोरी उपचारामुळे मेळघाटातील आदीवासी बांधवांचे आरोग्य



धोक्यात आले आहे. झोलाछाप अनेकदा विपरीत परिणाम होताना दिसुन येतात. तालुक्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असताना आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. तालुक्यातील 200 हुन अधिक खेडेगाव आहेत. तसेच जवळपास 60 टे 65 टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात शेतीशी जुळलेली असल्यामुळे गावखेड्यात वास्तव्याला आहे. मेळघाट भागातील आरोग्य यंत्रणा ही कमालीची दुर्लक्षित असुन याचाच गैरफायदा काही अप्रशिक्षित व्यक्ती पैसाच्या लालसेने बोगस डॉक्टरगिरी करुन मेळघाटातील भोळ्याभाबड्या नागरिकांच्या आयुष्याशी खेळ खेळत आहेत. मेळघाटातील नागरिकांच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार मेळघाट भागात अनेक वर्षांपासून राजरोसपणे सुरु आहे.

### प्रत्येक आजारा वर पेनकिलर

हे बोगस डॉक्टर कोणत्याही आजाराच्या रुग्णांना परतवून लावत नाहीत. ते सर्वच आजारांवर वेदना शामक (पेन किलर) गोळ्या देतात. रुग्णाला या गोळ्यांमुळे तात्पुरता आराम पडतो. परंतू किडनीवर यांचा गंभीर परिणाम होत असल्याची माहिती रुग्णाला नसते.

### शोध घेणाऱ्या समित्या नावालाच

बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे शासनाने निर्देश दिले असतानाही याकडे आरोग्य विभागाकडून पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले जात आहे. 5 सप्टेंबर 1991 चे शासन परिपत्रक व 7 फेब्रुवारी 2000 च्या अधिनियमांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याकरिता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. पण, या समित्या कागदावर उरल्या आहेत. तक्रार आलीच तर चौकशी करायची, असा फंडा या समित्यांनी अवलंबिला आहे. त्यात राज्य बोगस डॉक्टरविरहित राज्य करण्याचे शासन उद्दिष्टाला तिलांजली दिल्या गेली आहे. बोगस डॉक्टर शोधून कारवाई करण्यासाठी निर्धारित समित्यांनी व पोलीस यंत्रणेने सतत प्रयत्नशील राहणे आवश्यक असल्याचे शासन परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. याकरिता महाराष्ट्र वैद्यक व्यावसायिक अधिनियम 1961 मधील कलम 33, 33 ए व 38 यामध्ये शासनाने सुधारणा केली आहे. या सुधारणा अंतर्गत अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांच्या गुन्ह्याकरिता विहित केलेल्या शिक्षामध्ये वाढ करण्यात आली आहे. ही सुधारणा 13 मार्च 2001 पासून अमलात आली असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. असे असतानाही बोगस अनधिकृत झोलाछाप डॉक्टरांची बल्ले बल्ले बघायला मिळत आहे.

### कोण असते या समितीत

बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याकरिता गठित जिल्हास्तरीय समिती मध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष असून जिल्हा आरोग्य अधिकारी सदस्य सचिव आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक या समितीचे सदस्य आहेत. तालुकास्तरीय समितीमध्ये पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अध्यक्ष, तर तालुका वैद्यकीय अधिकारी सदस्य सचिव आहेत. आरोग्य विस्तार अधिकारी सदस्य म्हणून या समितीत आहेत. नगरपालिका स्तरावरील समितीमध्ये नगरपालिकेचे मुख्याधिकारी अध्यक्ष, तर आरोग्य अधिकारी सदस्य सचिव आहेत. तसेच एका पोलीस अधिकाऱ्याचाही समावेश या समितीमध्ये असतो.

### औषधांचे हाय डोज

मेळघाट भागातील नागरिकांची मिळकतही तुटपुंजी असल्यामुळे आणि उद्योग व्यवसायाच्या अभावामुळे पैश्याची नेहमी चणचण असते. या बाबीचा गैरफायदा हे मध्यप्रदेशचे झोलाछाप डॉक्टर नेहमी घेत असतात. कमी पैसामध्ये औषधांचे हाय डोजेस हे मेळघाटच्या आजारी नागरिकांच्या देत असतात. यामुळे रुग्णांना तत्काळ आराम मिळतो, परंतु हाय डोजचा शरीरावर विपरीत परिणाम होतो. या झोला छाप डॉक्टरांकडे कुठल्याही प्रकारचे आरोग्यविषयक ज्ञान नसल्यामुळे बऱ्याचदा मेळघाटात जीवितहानी सुध्दा होण्याची दाट शक्यता असते.

# आजपासून पौष मास मांड चा शुभारंभ

## सावंगा विठोबा चंदन उटी कार्यक्रम

महासागर प्रतिनिधी

**चांदुर रेल्वे,( दि.29 )** - तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे आज दिनांक 30 डिसेंबर 2024 सोमवारला सकाळी 5 वाजता संस्थानचे लहान मंदिरात विधीवत ढाल बसवून मुख्य मंदिरात पौष मांडीचा शुभारंभ महाराजांच्या गणाने विश्वस्त मंडळ आणि भाविक भक्तांचे उपस्थित होत आहे.

सकाळी 9.00 वाजता संस्थानमध्ये सोमवती अमावस्या निमित्त भजनासह खोलाड तिरी स्नानाचा कार्यक्रम, दुपारी 4.00 वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त 'चंदन - उटीचा कार्यक्रम' आणि रात्री 8 ते 10 संस्थानमध्ये अवधूत नाम प्रबोधनकार वासुदेव चोपकर, वर्हा, जि. अमरावती यांचा महाराजांचे ओवीवर प्रवचन इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता 'महाप्रसाद कार्यक्रम' संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात आयोजित करण्यात आला आहे. संस्थानमध्ये दि.30 डिसेंबर 2024 ते दि.30



जानेवारी 2025 पर्यंत संस्थान तर्फे 'पौष मास' निमित्त 'अखंड जागृती भजन' मांडीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गावातील आणि बाहेर गावातील अवधूत भजन मंडळांचा सहभाग राहणार असून या करिता संस्थानचे वतीने नियोजन करण्यात आले आहे. संस्थान तर्फे सहभागी अवधूत भजन मंडळाचा सन्मान करण्यात येऊन दैनंदिन चहा, नास्ता आणि भोजन इ.व्यवस्था करण्यात आली आहे. तरी सर्व भाविक- भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामण रामटेके, गोविंद राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# बडनेऱ्यातील बांग्लादेशी घूसखोर व रोहिंग्यांना भारतातून हद्दपार करा!

## 'हिंदूसुर्य प्रतिष्ठान' चे पोलीस निरीक्षकांना निवेदन

महासागर प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, ( दि.29 )**- बडनेरा परिसरात झोपडपट्टी भागात अनेक अवैध बांग्लादेशी व रोहिंग्या घूसखोरांचा स्थायी वास्तव्याला आहेत. त्यांनी अतिक्रमण करुन अनधिकृत झोपडपट्टी निर्माण केली आहे. त्यांच्याकडे अनधिकृत भारतीय नागरिकत्वाचे खोटे प्रमाणपत्र, आधारकार्ड, रेशनिंग कार्ड आहेत जे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दुष्टीने फार हानिकारक आहे. शिवाय स्थानिक सामाजिक आरोग्यासाठी हे घूसखोर आपायकारक ठरु



शकतात. सध्या बांग्लादेशा परिस्थिती प्रमाणे भविष्यात हे घूसखोर आपल्या शहराच्या कायदा व सुव्यवस्थेला एक मोठे अवाहन ठरु शकतात. या घूसखोरांची अपराधी मनोवृत्ती व गुन्हेगार प्रवृत्ती ही आपल्या शहराचा सामाजिक सलोखा धार्मिक, साप्रदायिक एकोपा बिघडविण्याचे कारण ठरु शकते. शिवाय स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारांवर हे घूसखोर घाला घालत आहे. स्थानिक संसाधनावर यांचा ताण पडू शकतो. या बांग्लादेशी घूसखोर, रोहिंग्यांमूळे बडनेरा शहराचा डेमोग्राफीक चेंज होत आहे. तरी बडनेरा शहरातील सुजान व जबाबदार नागरिकांच्या वतीने निवेदन करत या घूसखोरांवर कारवाई करुन बडनेरा शहराचे या बांग्लादेशी घोसखोरांन पासून, रोहिंग्या घूसखोरांन पासून भविष्य सुरक्षित करावे, अशी मागणी हिंदूसुर्य प्रतिष्ठानने केली. निवेदन देताना प्रदीप सोळंके, सिद्धू सोळंके, गुरुदयालसिंघ बावरी, करण सोळंके, अमर सरोदे, राहुल वगारे, सागर पवार, श्रीरंग बडनेरकर, आशुतोष जोशी, आदित्य राजपूत, आशुतोष पंजवानी, भोला पवार, दत्ता पवार, गोलू पवार, बिट्टू सोळंके, गोलू बोयत, बंटी सोळंकी, अजय कावरे, अथर्व गायकवाड उपस्थित होते.

# नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मारली बाजी



महासागर प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.29 )** - अमरावती येथील बिर्ला ओपन माईड इंटरनॅशनल स्कुल येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पीटीशन 2024 मध्ये चांदूर रेल्वे येथील विद्यार्थ्यांनी बाजी मारली.

या परिक्षेकरीता संपूर्ण विदर्भातून सुमारे 2500 विद्यार्थ्यांनी परिक्षेत सहभाग नोंदविला होता. ही स्पर्धा दोन टप्यात घेण्यात आली होती. 21 डिसेंबर 2024 ऑनलाईन पध्दतीने परिक्षेचे आयोजन केले गेले. यामध्ये भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगभरातुन विदयार्थ्यांनी सहभाग घेतला होता. दि.22 डिसेंबर 2024 रोजी आफलाईन परिक्षेचे आयोजन अमरावती येथील बिर्ला ओपन माईड इंटरनॅशनल स्कुल मध्ये करण्यात आले होते, यामध्ये सुध्दा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील मुलांनी सहभाग नोंदविला, यामध्ये चांदूर रेल्वे तालुक्यातील वर्ग 1 ते 8 च्या एकूण 16 विदयार्थ्यांनी सहभाग घेतला होता, यामध्ये 8 मिनीटात गणिताचे 100 प्रश्नांचे उत्तरे सोडवावी लागतात. या स्पर्धेमध्ये चांदूर रेल्वे येथील ब्रेन पॉवर ॲकेडमीच्या विविध शाळेतील 2 विदयार्थ्यांनी ग्रॅड मास्टर श्रेणीमध्ये, 5 विदयार्थ्यांनी प्रथम श्रेणीमध्ये, 5 विदयार्थ्यांनी व्दितीय श्रेणीमध्ये, 4 विदयार्थ्यांनी तृतीय श्रेणीमध्ये येवून चांदुर रेल्वे तालुक्याचे नाव उज्वल केले.

# सीआरपीएफ जवान ऋषिकेश लाडोलेचा सत्कार

महासागर प्रतिनिधी

**अचलपूर,( दि.29 )** - बिलनपूरा येथील रहिवासी ऋषिकेश मुकुंदराव लाडोले यांची केंद्रीय राखीव पोलीस दलात (सीआरपीएफ) जवान म्हणून निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अचलपूरचे नामांकित दंतचिकित्सक डॉ. अम्मार हुसेन यांनी त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी काँग्रेस नेते शेख कदीर पहलवान, फिरोज खान, मोहिब खान आणि नवेद खान यांचीही प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान ऋषिकेश लाडोले यांनी सांगितले की, त्यांनी कठोर



परिश्रम, समर्पण, आणि योग्य मार्गदर्शनामूळे यशाची पायरी गाठता आली. ते म्हणाले, जीवनात कोणतीही गोष्ट अवघड नाही. योग्य अभ्यास, मार्गदर्शन, आणि आई-वडील व गुरुजनांच्या सल्ल्यांचे पालन केल्याने कोणतेही मोठे ध्येय साध्य करता येते. ऋषिकेश यांनी त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांच्या आई-वडिलांना, गुरुजनांना, आणि मित्रांना दिले आणि मन:पूर्वक आभार मानले. त्यांच्या निवडीमुळे अचलपूर परिसरात आनंदाचे वातावरण आहे आणि ही कामगिरी तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल.

# चांदूर रेल्वे नगर परिषदच्या पाणीपुरवठ्याचा वीजपुरवठा महावितरणतर्फे खंडित



## शहराच्या इतिहासात पहिल्यांदा पाणीपुरवठा खंडीत

*महासागर प्रतिनिधी*

***चांदूर रेल्वे, ( दि.29 )- चांदूर रेल्वे नगर परिषदच्या पंप हाऊस येथील विद्युत पुरवठा महावितरणतर्फे शनिवारी ( ता. 28 ) दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास खंडित करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विद्युत देयक प्रलंबित असल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत झाल्याची माहिती महावितरणतर्फे मिळाली असुन शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच पंप हाऊसचा विद्युत पुरवठा 24 तासांच्या वर अजुनही खंडीत आहे. यामुळे रविवारी शहरवासीयांना पाण्यापासून वंचित राहावे लागले आहे. यावरून नगर परिषदचा बेजबाबदारपणा समोर आला आहे.***




चांदूर रेल्वे शहराला सध्यास मालखेड तलावावरून पाणीपुरवठा होत आहे. मालखेड तलावावरून पाणी शहरातील पंप हाऊस येथे जाते व येथून पाणी जलशुद्धीकरण केंद्रावर पाठविले जाते. आणि तेथून संपूर्ण शहराला पाणीपुरवठा होतो. मात्र पंप हाऊस येथील पाणीपुरवठा हा विज देयके प्रलंबित असल्यामुळे महावितरणतर्फे खंडित करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. यामुळे रविवारी शहरातील इंदिरा नगर, मंगलमुर्ती नगर, गुलमोहर कॉलनी, मेहेरबाबा कॉलनी, को - ऑपरेटीव्ह बँक कॉलनी या भागात होणारा पाणीपुरवठा झालाच नाही. अशामुळे या भागातील नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागले. नगर परिषदेत नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, नगरसेवक हे लोकप्रतिनिधी असतांना 24 तासांच्या वर कधीही पाणीपुरवठा खंडित राहिला नाही. मात्र स्थानिक नगर परिषदमध्ये 27 डिसेंबर 2021 पासून संपूर्ण कारभार हा प्रशासकाकडे असतांना प्रशासकाच्या काळात चांदूर रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदाच 24 तासांच्या वर पाणीपुरवठ्याचा विद्युत पुरवठा खंडित राहिला आहे हे विशेष. त्यामुळे याला दोषी कोण ? याचा वरिष्ठांनी तपास करणे गरजेचे झाले आहे. यावरून नगर परिषदेचा ढिसाळ कारभार उघडकीस आला आहे.

### तांत्रिक समस्येमुळे पाणीपुरवठा बंद

तांत्रिक समस्येमुळे शहरातील पाणीपुरवठा हा बंद असून लवकरच सुरळीत करण्यात येणार असल्याची माहिती नगर परिषदेचे पाणीपुरवठा अभियंता आशिष कुऱ्हाडे यांनी दिली. तर मुख्याधिकारी यांना प्रतिक्रिया करिता कॉल लावला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### 5 लाखांच्या जवळपास विद्युत देयक प्रलंबित

पंप हाऊसचे विद्युत देयक 5 लाखांच्या जवळपास प्रलंबित आहे. यासंबंधी नगर परिषदला सुचना सुध्दा दिली होती. यानंतर आम्ही सदर विद्युत पुरवठा खंडीत केला असल्याची प्रतिक्रीया महावितरणचे सहाय्यक अभियंता (शहर) दिक्षांत कवाडे यांनी दिली.

# हिवरखेड येथे विविध संस्थेमध्ये संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी



महासागर प्रतिनिधी

**हिवरखेड, ( दि.29 )**- मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे निष्काम कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या 68 वी पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी वैराग्यमुर्ती गाडगे बाबांच्या जीवनावर आपले विचार प्रगट केले.

हिवरखेड येथील महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात 20 डिसेंबर रोजी संत गाडगे महाराज यांच्या 68 वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सुनंदा दातीर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.सुभाष पारीसे, प्रा. अमोल इंगळे उपस्थित होते. सर्वप्रथम कार्यक्रमातील पाहुण्यांच्या हस्ते कर्मयोगी गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील काही विद्यार्थ्यांनी गाडगे बाबांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

शिक्षक दातीर यांनी सुद्धा गाडगे बाबांच्या कार्याचा अवाका किती मोठा होता, हे पटवून देतांना विद्यार्थ्यांनी सुद्धा यातून चांगले विचार आत्मसात केले पाहिजे हे सांगितले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन गजानन आमले यांनी गाडगेबाबांच्या आवडत्या भजनाने केले. प्रा.इंगळे यांनी पाहुण्यांचे तसेच कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानलेत. या कार्यक्रमाला शाळेतील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी उपस्थित होते.

## सदाफळे विद्यालयात वैराग्यमुर्तीचे स्मरण



**हिवरखेड** - येथील नागोराव दादा सदाफळे नवोदय विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे कलाध्यापक प्रल्हाद बुले अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख प्रमुख अतिथी म्हणून जितेंद्र ना. फुटाणे (पत्रकार) उपस्थित होते.

सर्वप्रथम वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर आर्या ढोमणे, लावण्य नानोटकर, हर्षल पाचारे, मयूर सावरकर, तन्मय महल्ले, माहेश्वरी ठाकरे, रिया सदाफळे जीविका गायकवाड, कार्तिक सोनारे अर्णव सदाफळे स्वरा भुजाडे, लावन्या गावंडे, अथर्व भुंबर, तन्वी वाघाडे, सृष्टी डायलकर, रोशनी शेळके,समृद्धी महल्ले,यश जवंजाळ, देवांत गावंडे, अर्णव सातपुते, रामेश्वरी फुले, भावेश महानकर, मानवी सदाफळे या विद्यार्थ्यांनी वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तसेच महादेव नागदेवे, सुनीता श्रीवास, प्रल्हाद बुले यांची सुद्धा भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन प्रगती नरेश सातपुते व विधी मंगेश धोटे यांनी केले. याप्रसंगी संजय बोंडे, उमेश चव्हाण, महादेव नागदेवे, श्रीकांत विघे, निलेश रायचुरा, सुनीता श्रीवास, स्वाती पारीसे, महादेव कदम इत्यादी शिक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते.